गुरुगीतेतील संदेश

प्रा. डॉ. वृंदा देशपांडे-जोशी

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,

सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतीय संस्कृतीमध्ये 'गुरु'चे अनन्य महत्त्व आहे. गुरूला परब्रह्माचे स्थान दिलेले आहे. व्यापक पातळीवर आपण निसर्गाला गुरु मानतो. त्यावेळी पशु-पक्षी-वृक्ष-नदी-समुद्र-पर्वत आदींकडून जे जे शिकण्यासारखे आहे ते ते आत्मसात करावे हा भाव त्यामागे असतो. कुटुंबामध्ये व्यक्तीचा पहिला गुरु म्हणून 'आई'कडे पाहिले जाते. त्यावेळी आपल्याला गर्भावस्थेपासून बाळाचे सुरु झालेले शिक्षण आणि नंतर आईशी असलेल्या भावबंधातून, आईच्या सहवासातून प्राप्त झालेले शिक्षण अभिप्रेत असते. औपचारिक शिक्षणाकडे माणूस वळतो तेव्हा शाळा-महाविद्यालयातून त्याचं शिक्षकाशी एक नातं तयार होतं. धार्मिक-अध्यात्मिक जीवनात गुरुमंत्र घेऊन गुरु करण्याची पद्धत आजही आपल्याकडे आहे. सर्व आयुष्य आपण जगतो तेव्हा अनुभव हाच गुरु, याचाही प्रत्यय आपण घेतो. भारतीय संस्कृतीचा महिमा सांगताना गुरुकुल पद्धत, संत साहित्यातील गुरु महात्म्य, गुरु-शिष्यांच्या जोड्या आपण आवर्जून सांगतो. एकूणच गुरु हा विषय आपल्या जिव्हाळ्याचा आणि चिंतनाचा राहात आलेला आहे. साहजिकच 'गुरुगीता' गुरूबाबत काय सांगते, काय संदेश देते हे जाणून घेणं आपल्या कुतूहलाचा विषय आहे. त्या कुतूहलातूनच केलेला हा लेखनप्रपंच.

'गुरुगीता' सांगितली गेली आहे ती स्कंदपुराणामध्ये. १८ पुराणांपैकी १३ व्या क्रमांकावर असलेले, भगवान व्यास रचित ८१ हजार श्लोकांचे हे महापुराण भगवान स्कंद यांनी सांगितले म्हणून ते 'स्कंदपुराण' या नावाने ओळखले जाते. यामध्ये स्कंद (कार्तिकेय) यांच्या द्वारे शिवतत्त्वाचे विवेचन आलेले आहे. भारतातील शैव व वैष्णव तीर्थक्षेत्रांचे वर्णन करणे हा या पुरणाचा प्रमुख विषय आहे. माहेश्वर, वैष्णव, ब्रह्म, काशी, अवंतिका, रेवा असे या स्कंदपुराणाचे सहा खंड आहेत. मराठी भाषेमध्ये श्री. रामचंद्र कामत आणि श्री. दिवाकर घैसास यांनी संपादित केलेली सार्थ श्रीगुरुगीता प्रमाण मानून यापुढे विवेचन करण्यात येत आहे.

आदिशक्ती देवी पार्वती आणि भगवान शिव यांच्यामधील संवाद गुरुगीतेच्या मुळाशी आहे. शिष्यभावाने माता पार्वती जगद्गुरु श्रीशंकराला प्रश्न विचारते-

केन मार्गेन भो स्वामिन्, देही ब्रह्ममयो भवेत् ।

त्वं कृपा कुरू मे स्वामिन्, नमामि चरणौ तव ॥

अर्थात 'देहधारी जीव कोणत्या मार्गाने ब्रह्मरूप होईल?' असा सर्वांना कल्याणप्रद मार्ग दाखवणारा प्रश्न पार्वती विचारते. त्यावेळी 'गुरुं विना ब्रह्म नान्यत्' - गुरुवेगळे दुसरे आणखी ब्रह्म असे काहीच नाही, असे स्पष्ट, नि:संदिग्ध उत्तर भगवान शंकर देतात. गुरुतत्त्वाचे ज्ञान करून घेतल्याशिवाय केलेले यज्ञ, तप, दान, जप, तीर्थयात्रा सर्व व्यर्थ ठरते. हे गुरुतत्त्व कसे आहे तर -

गुकार: प्रथमो वर्णो, मायादिगुणभासक: ।

रुकारो द्वितीयो ब्रह्म, मायाभ्रन्तिविनाशनम्॥

गुरु शब्दातील पहिला वर्ण माया आणि त्रिगुणांचा प्रत्यय देणारा आहे तर दुसरा वर्ण मायेचा भ्रम नष्ट करणारा ब्रह्मरूप आहे. अशा या गुरूकडे शिष्याला गुणातीत, रूपातीत नेण्याचे म्हणजेच मोक्ष देण्याचे सामर्थ्य असते. गुरु हा शिवस्वरूप आहे.

गुरुकृपा प्राप्तीसाठी, गुरुकडून मोक्ष मिळवण्यासाठी गुरुसेवा करणे हे एकमेव साधन आहे. काया-वाचा-मने ही गुरुसेवा घडावी. गुरु जिथे राहतात तेच काशी क्षेत्र जाणावे. गुरुचे नामसंकीर्तन घडावे. गुरूच्या मूर्तीचे ध्यान करणे, गुरुजप करणे, हे शिवस्वरूपाचे ध्यान केल्यासारखेच आहे. ब्रह्म हे शब्दरूपाने गुरुमुखी राहते.गुरुंनी सांगितल्यानुसार आचरण करणे आवश्यक आहे. गुरु मुखात निवास करणारी विद्या फक्त गुरु भक्तीनेच प्राप्त होते. त्यामुळे गुरूंना अनन्य शरण जावे. ऐहिक आणि पारलौकिक सुखोपभोग गुरुकृपेमुळेच प्राप्त होतात. गुरू आत्मज्ञानाच्या सामर्थ्याद्वारा, शिष्याने अनेक जन्मात केलेले पूर्वकर्म नष्ट करून या कर्मबंधनातून शिष्याला मुक्त करतात. गुरुकृपेमुळे इतर सर्व संपत्ती तुच्छ वाटू लागते. सर्व दुर्गुणांना दूर करून ब्रह्म याच पदावर ती शिष्याला एकाग्र करते. 'अहं ब्रह्मास्मी' हा अनुभव देण्याचे सामर्थ्य, आत्मस्वरूप सर्व भूतमात्रांच्या आत्मस्वरूपाशी एकरूप असल्याचा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य गुरुकृपेमध्येच आहे. देव,

किन्नर, गंधर्व, पितर, यक्ष, चारण आणि मुनी हे देखील गुरू सेवेपासून विन्मुख झाले की मोठ्या अहंकाराने भरून जाऊन तप व विद्या यांचा अभिमान वाटून मोक्षापासून वंचित राहतात.

भगवान शंकर अखेरीस सांगतात -

अगोचरं तथाऽगम्यं, नामरूपविवर्जितम् ।

नि:शब्द तद्विजानियात्, स्वभावं ब्रह्म पार्वती ॥

ब्रह्म स्वत:च्याच अस्तित्वात तिथे असते पण ते इंद्रियगोचर नाही, त्याला नाव, रूप, शब्द नाही. ते गुरुकृपेने जाणून घ्यावे. ब्रह्मज्ञान तद्रूप करणारे असते.

गुरुगीतेच्या संदेशाचा आजच्या काळात विचार करताना बदललेली परिस्थिती साहजिकच लक्षात घ्यावी लागते. मूळ विषयाच्या अनुषंगाने गुरुगीतेमध्ये गुरु कसे असावेत, शिष्य कसे असावेत व गुरु-शिष्य संबंध ब्रह्मप्राप्तीप्रती जाणारे कसे असावेत याचे विवेचन केलेले दिसून येते. गुरूच सर्व काही आहे व गुरुप्रती समर्पित व्हा असे भगवान शंकर सांगतात, तेव्हा गुरुतत्वाचा व्यष्टीमधील अत्युच्च, परिपूर्ण विकास त्यांना अभिप्रेत आहे. अशाच गुरूची हरप्रकारे सेवा करायला ते सांगतात. आजचे कोणतेही क्षेत्र घेतले तरी गुरू हा चिंतेचा विषय आहे. अशा परिस्थितीत ब्रह्मप्राप्ती, ज्ञानप्राप्ती कशी करून घेणार?

ही ब्रह्मप्राप्ती करू इच्छिणा-याला त्याची आस लागली पाहिजे. ब्रह्म स्वत:च्याच अस्तित्वात तिथे असते, हे जे भगवान शंकराने सांगितलेले आहे त्या आत्मस्वरूपाची ओळख पटवून घ्यावी लागेल. त्यासाठी श्रद्धेने दृढ साधना करावी लागेल. ही साधना करण्यासाठी जीवनातून दूर जाण्याची आवश्यकता नाही. उलट दैनंदिन नित्यकर्म चैतन्यपूर्ण जाणिवेने करून ज्या परमात्म्याचे आम्ही अंश आहोत त्याला भक्तिभावाने समर्पित केले तर अहंकाररहित आत्मोन्नती दूर राहात नाही. ज्ञानपूर्ण भक्तियुक्त निष्काम कर्म हे ब्रह्म जाणण्याचे वर्म असू शकते.